MHRT030007702019

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१८४/२०१९**

**निशाणी क्र.२२ खालील आदेश**

(सौ. वैष्णवी प्रदिप संकपाळ विरुध्द प्रदिप तुकाराम संकपाळ)

**१.** प्रस्तुतचा अर्ज यातील अर्जदार क्र.१ ते ३ यांनी सामनेवाला यांचे विरुध्द 'डिफेन्स स्ट्राईक आऊट' चा आदेश पारित होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदार यांचे संक्षिप्त कथन पुढीलप्रमाणे –

प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदार हिने दिलेल्या निशाण क्र.१० च अंतरीम पोटगी मिळणेचे अर्जावर मे. कोर्टाने सामनेवाला यांनी अंतरीम अर्ज दाखल दिनांक ०६/१२/२०१९ पासून अर्जदार क्र.१ हिला दरमहा रुपये १०००/– व अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा रुपये ५००/– द्यावेत असा आदेश दिनांक १३/०३/२०२० रोजी केला आहे. परंतू, सामनेवाला सदर तारखेपासून दिनांक ०६/१२/२०२१ रोजी केला आहे. सामनेवाला सदर तारखेपासून दिनांक ०६/१२/२०२१ अखेरपर्यंत अर्जदार क्र.१ ते ३ यांना एकूण रक्कम रुपये ४८,०००/– देणे लागत असून सामनेवाला यांनी आज पर्यंत अर्जदार क्र.१ ते ३ यांना अंतरीम पोटगीपैकी एकही पैसा दिलेला नाही. असे करुन सामनेवाला याने न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करुन अवमान केला आहे. त्यामुळे सामनेवाला यांचे विरुध्द 'डिफेन्स स्ट्राईक आऊट' चा आदेश पारित करणेत यावा अशी विनंती

त्यांनी याकामी केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास सामनेवाला यांनी निशाण क्र.२५ येथे त्यांचे म्हणणे देऊन त्यामध्ये नमूद केले की, त्यांचे विरुध्द अंतरिम पोटगीच्या अर्जावर पारित करण्यात आलेल्या आदेशावरुन रुपये ४८,०००/– पैकी रुपये ५०००/– इतकी रक्कम न्यायालयात भरत आहेत. तसेच उर्वरित रक्कम भरणेकरिता त्यांनी मुदत मागितली आहे.

४. प्रस्तुत अर्जावर दोन्ही बाजूंकडील युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत अर्जदार यांचे अर्जाचे व त्यावरील सामनेवाला यांचे म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, अर्जदार प्रस्तुत अर्जाद्वारे करत असलेली मागणीकरिता अर्जदार यांनी त्यांचे प्रस्तुत अर्जातील तोंडी कथनांशिवाय कोणताही आवश्यक पुरावा अर्जाचे अभिलेखाकामी आणलेला नाही. तसेच मुळ अर्जाचा अभिलेख पाहता सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जावरील त्यांचे म्हणण्यामध्ये उल्लेखित केल्याप्रमाणे सामनेवाला यांनी अर्जदार यांना पोटगी देण्याचे पोटी रक्कम रुपये ५,०००/– इतकी अर्जदार यांना अदा केलेली आहे. तसेच उर्वरित पोटगीची रक्कम देखील ते अर्जदार यांना अदा करणार असल्याचे त्यांनी या न्यायालयासमोर मान्य केलेले आहे. या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करता सामनेवाला यांना मुळ अर्जाचे कामी त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल असे वाटते. तसेच मुळ अर्जाचा अंतिम निकाल योग्य त्या गुणदोषांवर होणेस देखील मदत

होणार आहे. त्याकारणास्तव अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणे हे उचित होणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज (निशाण क्र.२२) नामंजूर करणेत येतो.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2022.02.25 17:55:22 +0530

**रत्नागिरी**
**दिनांक–२४/०२/२०२२**

**( श्रीम. पी.एस.गोवेकर )**
**४थे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**रत्नागिरी.**